# विशेष दिवाणी दावा क्र.९/२०१९

**CNRNoMHOS**120003502019

**सरस्वती वि. मधुकर**

**नि.क्र. १७ खालील आदेश**

**(आदेश दि.१८/०८/२०२२)**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ (१७) अन्वये दाव्यामध्ये टंकलेखनाच्या चुकीमुळे परिशिष्ट 'अ' मध्ये अ.क्र.३ येथे जमीन भू.क्र.३८० क्षेत्र ०० हे ३९ आर आकार ०६ रु. १४ पैसे असे नमूद केले आहे. त्या ऐवजी जमीन भू. क्र. ६८० ऐवढी दुरुस्ती करून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी म्हणणे दाखल केलेले नाही.

३. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

४. वादीच्या दाव्याचे अवलोकन करता, त्याच्या परिच्छेद आठ मध्ये भू. क्र. ६८० असा नंबर नमूद आहे. तथापि, दाव्यासोबत परिशिष्ट 'अ' मध्ये अ.क्र. ३ येथे भूमापन क्र. ६८० ऐवजी ३८० असा नमूद झाल्याचे दिसून येते त्याचप्रमाणे वादीने दाव्यासोबत जी दस्तऐवज यादी दाखल केली आहे त्या यादीसोबत जोडलेल्या गाव नमुना आठ–अ व सातबारा उता–यावर येथे देखील भूमापन क्र.६८० दिसून येतो व ३८० हा दिसून येत नाही. त्यामुळे वादीने मागितलेली दुरुस्ती ही केवळ टंकलेखनाच्या चुकीमुळे झाल्याचे स्पष्ट होते. सदरची दुरुस्ती ही औपचारीक असल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी अजुनही पुरावा चालू झालेला नाही. तसेच, प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुलभूत स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. सबब, खालील आदेश.

## आदेश

०१. नि. क्र. १७ खालील अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. मंजूर झालेली दुरुस्ती वादीने आजपासून १४ दिवसांच्या आत नि.क्र. १ मध्ये करण्याचे आहे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च वादीने सोसायचा आहे.

स्वाक्षरित/–

दिनांक – १८/०८/२०२२

(ए. पी. कुलकर्णी )
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
भूम.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 18/08/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 18/08/2022 |
| Order uploaded on | --- | 18/08/2022 |